INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD)
© 2026 IJNRD | Volume 11, Issue 8, August 2026 | ISSN: 2456-4184 | IJNRD.ORG

# प्राथमिक शिक्षकांसाठी प्राथमिक स्तरावर अध्यापन सुलभ व कृतीयुक्त होण्यासाठी ए आय चा कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि त्याची उपयुक्तता याचा अभ्यास

*लेखक:- राजू सुखदेव आटपाडकर*
*पद:- उपशिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौगुले हजारे दुधाळ मळा, अग्रण धुळगाव, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली.*

*१) घोषवारा*
*प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. विद्यार्थ्यांना अध्यापन करत असताना विविध समस्यांना शिक्षकांना तोंड द्यावी लागते. प्राथमिक स्तर हा इयत्ता पहिली ते इयत्ता पाचवी पर्यंतच्या वर्गाचा असतो. यामध्ये वयोगट सहा वर्ष ते 14 वर्ष असतो. या वयोगटातील विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश होतो. या वयोगटातील विद्यार्थ्यांना आनंददायी कृतीयुक्त ज्ञानरचनावादी पद्धतीने अध्यापन करावे लागते. यांना अध्यापन पद्धती निवडताना विद्यार्थी केंद्रित अध्यापन निवडावी लागते. ए आय चा कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर - नियोजन यामध्ये वार्षिक नियोजन, घटक नियोजन, पाठ नियोजन तसेच मूल्यमापन करण्यासाठी, त्याचबरोबर शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी केल्यामुळे शिक्षकांचा वेळ वाचतो व सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या बुद्धिमत्तेनुसार व स्तरानुसार अभ्यास देता येतो. यामुळे अध्यापन दर्जेदार होते. याविषयीचा या संशोधनांमध्ये माहिती दिली आहे.*

*प्रस्तावना*
*प्राथमिक स्तरावरील मुले ही सहा ते चौदा वयोगटातील असतात. त्यांना अध्यापन करताना विद्यार्थी केंद्रित, खेळ आधारित व शैक्षणिक साहित्याचा वापर करून अध्यापन करावे लागते. या ठिकाणी व्याख्यान पद्धती उपयोगी पडत नाही तसेच वर्गात विविध स्तराचे बुद्धिमत्ता चे विद्यार्थी असतात. त्यांना प्रत्येकाला वेगवेगळे मार्गदर्शन करावे लागते. त्यासाठी शिक्षकाला प्रत्येकाला वेळ द्यावा लागतो आणि प्रत्येकाला वेळ देणे, यासाठी शिक्षकांच्या मर्यादा पडतात. त्या ठिकाणी ते इतर विद्यार्थ्यांची मदत घेतात व सहाध्यायीच्या साह्याने अध्यापन करतात. परंतु ए आयचा वापर केल्यामुळे शिक्षकाला एक मदत सहाय्यक ठरू शकणार आहे. त्यामुळे शिक्षकाचे अध्यापन अधिक सुलभ आनंददायी होऊन शकणार आहे. ए आयचा वापर एक साधन म्हणून जर केला तर ते शिक्षकाला इतर साधना बरोबर एक नाविन्यपूर्ण आणि चांगल्या दर्जाचे साधन म्हणून हे वापरता येऊ शकणार आहे.*
*संशोधनाची उद्दिष्टे*
*ए आयच्या विविध साधनांची ओळख करून घेऊन त्याचा परिणाम कारक वापराची माहिती घेणे.*
*ए आयच्या साधनांचा वापराचे महत्व समजून घेणे.*
*ए आय साधनाच्या विविध मर्यादा जाणून घेणे.*
*शिक्षकाचे काम सोपे होण्यासाठी ए आयच्या विविध संकल्पना समजून घेणे.*

*कार्यपद्धती*
*त्या संशोधनात गुणात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा qualitative method चा वापर केला आहे. शिक्षण विभागातील दीक्षा □प, ए आयच्या विविध टूलचा वापर करून शोध निबंध तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये kahoot विश्लेषण*
*अध्यापनात ए आयचा वापर त्याचे निष्कर्ष खालील प्रमाणे*
*शैक्षणिक साहित्य निर्मिती*
*कॅनव्हा, चॅट जी पी टी, जेमिनी यासारख्या विविध टूलचा वापर करून पाठ घटकांनुसार आकर्षक चित्र तयार करता येते व त्याचा वापर विद्यार्थ्यांना संकल्पना समजून देण्यासाठी करता येतो.*
*ए आयच्या मदतीने भाषा सारखा विषय शिकवत असताना त्यातील कवितांना चाली देणे यासाठी देखील शिक्षकाला याची मदत होऊ शकते. व्याकरणातील चुका शोधणे. यासाठी शिक्षकाला मदत होऊ शकते.*

*इंग्रजी सारख्या इतर भाषा शिकताना, त्याला भाषांतर करणे, विविध शब्दांचे अर्थ समजून घेणे, त्या शब्दाचा वाक्यात उपयोग कसा करावा, त्याचबरोबर एकादा शब्द त्यासंदर्भात चित्र किंवा त्यासंदर्भात व्हिडिओ पाहून विद्यार्थ्यांना समजून घेता येतो. यासाठी वेगळी भाषा शिकताना विद्यार्थ्याला ए आयचा वापर करून ती भाषा अधिक चांगल्या प्रकारे समजून देता येऊ शकते.*

*मनोरंजक अध्यापन पद्धती व मूल्यमापन*

***Kahoot** यांद्वारे विद्यार्थ्यांना मनोरंजन पद्धतीने प्रश्नावली मध्ये बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न विचारून विद्यार्थ्यांकडून सराव करून घेता येतो. त्याचबरोबर आनंदी वातावरणात त्यांना अध्यापन करता येते आणि त्याचबरोबर मूल्यमापन करता देखील येते.*

*विशेष सराव*

*जे विद्यार्थी अप्रगत आहेत. ज्यांना पाठ्य घटक शिकत असताना मागे राहतात. त्यांचा विशेष सराव करून घेण्यासाठी, वेगवेगळ्या प्रश्नपत्रिका देऊन त्याच घटकांचे विविध व्हिडिओ त्यांना दाखवून सोप्या पद्धतीने मार्गदर्शन करून ए आयच्या मदतीने त्यांना या संकल्पना समजून देता येतात व त्यांचे मूल्यमापन देखील करता येते. त्यांच्या बौद्धिक स्तरानुसार त्यांना अध्यापन करता येते त्याचबरोबर स्वाध्यायाचा सराव देखील घेता येऊ शकतो.*

*शिक्षकांना सहाय्यभूत*

*विविध स्तरातील विविध बुद्धिमत्तेचे विद्यार्थी वर्गात असतात. त्यांना त्यांच्या स्तरानुसार बौद्धिक पातळीनुसार त्यांना चाचण्या उपलब्ध करून देता येतात.*

*मूल्यमापन करताना त्यांच्या विषयानुसार वर्गानुसार श्रेणीनुसार वर्गवारी करता येते. यासाठी ए आयच्या माध्यमातून कमी वेळात निष्कर्ष त्याचबरोबर निकाल पत्रक आणि वर्गवार निकाल पत्रक तयार करता येते.*

*मर्यादा व आव्हाने*

*केवळ ए आयचा वापर न करता, त्याची मदत कशी घ्यावी हे समजून घेणे महत्त्वाचे आहे व त्याचा पूर्णपणे वापर टाळावा.*

*ए आयचा वापर कसा करावा, याचे प्रशिक्षण शिक्षकांना देणे गरजेचे आहे.*

*जास्तीत जास्त मोबाईल व कम्प्युटरचा वापराचा वेळ यामुळे वाढणार आहे.*

*निष्कर्ष*

*पूर्णपणे ए आयचा व तंत्रज्ञानाचा प्राथमिक स्तरावर वापर करता येणार नाही, कारण या ठिकाणी असणारा वयोगट हा लहान विद्यार्थ्यांचा असणारा आहे, 6 ते 14 वयोगटातील ही बालक असल्यामुळे यांच्याशी जास्तीत जास्त शिक्षक / शिक्षिका यांचा प्रत्यक्ष संपर्क येणं गरजेचे आहे. त्यामुळे त्यांना चांगले मार्गदर्शन होऊ शकते. परंतु ए आयचा वापर एक चांगला सक्षम सहाय्यक म्हणून या शिक्षकांना मदत करू शकतो. त्यामुळे प्राथमिक स्तरावर वापर करण्यासाठी निश्चित याचा चांगला उपयोग होणार आहे. यासाठी शिक्षकांनी याचे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. त्यामुळे जे प्राथमिक शिक्षणाचे ध्येय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे आहे, ते ध्येय निश्चित साध्य करता येईल. त्यासाठी निश्चितच ए आय उपयोगी पडेल.*

*संदर्भ*

*राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 - तंत्रज्ञान आणि शिक्षण विभाग,*

***A I in primary education** इनोस्को मार्गदर्शिका,*

*दीक्षा आणि ही पाठशाला डिजिटल उपक्रम अहवाल.*

***Copyright & License:***

*© Authors retain the copyright of this article. This work is published under the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY 4.0), permitting unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.*